॥ अंतरी पेटवू ज्ञानज्योत ॥

# उत्तर महाराष्ट्र विद्यापीठ, जळगाव - ४२५००१

# NORTH MAHARASHTRA UNIVERSITY, JALGAON-425001

'A' Grade
NAAC Re-Accredited
(3rd Cycle)

**(निवडणूक शाखा)**

जा.क्र.उमवि/२/निवडणूक/172/२०१७ दिनांक :३१/०८/२०१७

प्रति,
उत्तर महाराष्ट्र विद्यापीठाशी संलग्न सर्व महाविद्यालयांचे
मा.प्राचार्य व मान्यताप्राप्त परिसंस्थांचे मा.संचालक.

विषय :- **विभागप्रमुखांच्या गटामधून अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाच्या विभागप्रमुखांच्या नामनिर्देशन अर्जांच्या छाननीबाबत.**

महोदय,

महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ नुसार विद्यापीठाच्या विविध प्राधिकरणांच्या निवडणुका घेण्यासाठी अधिनियमातील तरतुदीन्वये विद्यापीठाने प्रसिध्द केलेल्या निवडणूक कार्यक्रमानुसार विभागप्रमुखांच्या गटामधून अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाच्या विभागप्रमुखांच्या गटांमधून कायदा कलम ४० (२) (ग) नुसार निवडून द्यावयाच्या सदस्यांसाठी निवडणूक सूचना दि.२२/०८/२०१७ रोजी प्रसिध्द करण्यात आली असून त्या अनुषंगाने दि. ३० व ३१ ऑगस्ट, २०१७ रोजी विद्यापीठास विभागप्रमुखांच्या गटामधून अभ्यासमंडळावर निवडून द्यावयाच्या विभागप्रमुखांच्या गटामधून नामनिर्देशन अर्ज प्राप्त झालेले आहेत.

उपरोक्त अनुषंगाने महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ चा सन २०१७ चा एकरुप परिनियम क्र.१ मधील कलम १० (६) नुसार नामनिर्देशन अर्जांची छाननी खालील ठिकाणी करावयाचे विद्यापीठाने निश्चित केले आहे ;

| **नामांकन अर्जांच्या छाननीचे ठिकाण** | **दिनांक व वेळ** |
|---|---|
| **कुलसचिव कार्यालय** | **०१/०९/२०१७<br>दुपारी ०२.३० वाजता** |

या संदर्भात आपणास कळविण्यात येते की, उमेदवार किंवा उमेदवाराव्दारे लिखीत स्वरुपात योग्य पध्दतीने प्राधिकृत करण्यात आलेली, आणि ज्याचे नाव अंतिम मतदार यादीत समाविष्ट आहे, असा उमेदवाराचा प्रतिनिधी हे अशा छाननीच्या वेळी उपस्थित राहण्यास हक्कदार असतील, याची कृपया नोंद घ्यावी.

कळावे,

आपला विश्वासू,

(प्रा.अ.बा.चौधरी)
प्र.कुलसचिव तथा
निवडणूक निर्णय अधिकारी

पत्र पेटी क्र. : ८०, उमविनगर, जळगाव, दूरध्वनी क्र.०२५७-२२५७२११, १२, १४ आणि २२५७३४८ फॅक्स क्र. :०२५७-२२५८४०३, ४०६
Post Box No. : 80, Umavinagar, Jalgaon Telephone Nos. : 0257-2257211, 12 , 14 and 2257348
Fax Nos. : 0257-2258403, 406 e-mail Id : registrar@nmu.ac.in and election2017@nmu.ac.in